Web. : www.waibank.co.in

जिथं जिव्हाळा जोपासला जातो •••

# दि वाई अर्बन को-ऑप. बँक लि., वाई

१०० 2020-21 शताब्दी वर्ष

**प्रधान कार्यालय : ५९१, गणपती आळी, वाई, ता.वाई, जि.सातारा. पिन : ४१२८०३.**

☏ : ०२१६७-२२०७७७, २२०८७७ मो. ८३८००१२१८३, ९०११०६७७५०. Email : wucb@waibank.com

## १०० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**(फक्त सभासदांसाठी)**

**सप्रेम नमस्कार विनंती विशेष....**

**दि वाई अर्बन को-ऑप. बँकेच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यात येते की, कोविड-१९ वैश्विक महामारीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांचे पालन करून व मा.सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्या परिपत्रकातील निर्देशानुसार, आपल्या बँकेची १०० वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार, दि. ३० सप्टेंबर २०२१ रोजी सायं. ५ वा. ऑनलाईन पद्धतीने V.C. (Video Conferencing) द्वारे पुढील नमूद केलेल्या विषयांचा विचार करणेसाठी आयोजित केली आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी कृपया वेळेवर इंटरनेट सेवा उपलब्ध असलेल्या संगणक/लॅपटॉप/स्मार्टफोन याद्वारे ONLINE उपस्थित राहावे, अशी विनंती.**

### सभेपुढील विषय

१) दिनांक २१ मार्च २०२१ रोजी झालेल्या ९९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) मा. संचालक मंडळाने सादर केलेला सन २०२०-२०२१ या आर्थिक सालचा अहवाल व दि. ३१/०३/२०२१ अखेरचा मा. वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा-तोटापत्रक स्विकृत करणे.
३) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाचे नफा विभागणीस मान्यता देणे.
४) सन २०२०-२०२१ चा मा. वैधानिक लेखापरीक्षकांचा तपासणी अहवालाची व सन २०१९-२०२० च्या वैधानिक लेखापरीक्षणाचा दोषदुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
५) सन २०२०-२०२१ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे, तसेच सन २०२१-२०२२ च्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
६) सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी मा.संचालक मंडळाने वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणेसाठी घेतलेल्या निर्णयास मंजुरी देणे.
७) मा. वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली संशयीत व बुडीत कर्जे येणेबाकी कर्ज वसुलीचे अधिकार अबाधित राखून केवळ निर्लेखित करणेस मंजूरी देणे.
८) महाराष्ट्र शासनाच्या एकरकमी परतफेड योजनेअंतर्गत सवलत दिलेल्या कर्ज रक्कमांची माहिती घेणे व मा. संचालक मंडळाच्या निर्णयाची नोंद घेणे.
९) आपल्या बँकेचे मल्टीस्टेट बँकेमध्ये रूपांतरण करण्यासाठीचा प्रस्ताव मंजूर करणे आणि मा. सेंट्रल रजिस्ट्रार, सहकार विभाग, नवी दिल्ली यांचेकडे प्रस्ताव पाठविणेस मंजूरी देणे
१०) बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
११) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करून निर्णय घेणे.

(मा. संचालक मंडळाचे आदेशानुसार)
सही/-
**श्रीपाद कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**ठिकाण : वाई, जि.सातारा**
**दि. : १५/०९/२०२१**

### विशेष सूचना

१) गणसंख्येच्या पूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा Online पद्धतीने त्याच दिवशी अर्ध्या तासाने भरेल अशा सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.
२) सभेचे कामकाज मर्यादित वेळेत पार पाडता यावे, यादृष्टीने ज्या सभासदांना काही सूचना मांडावयाच्या असतील किंवा अहवाल व ताळेबंद विषयक विधायक स्वरूपाची माहिती विचारावयाची असेल त्यांनी कृपया दि. २७/०९/२०२१ पर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लेखी किंवा wub99agm@waibank.com ई-मेलवर विचारणा करावी, म्हणजे माहिती देणे शक्य होईल. ऐनवेळेस विचारलेली माहिती वा आकडेवारी लगेच देणे शक्य होईलच असे नाही.
३) सर्व सभासदांनी आपला Whatsapp मोबाईल क्रमांक व ई-मेल आय.डी. संपूर्ण नाव व पत्त्यासहीत, आपल्या जवळच्या शाखेमध्ये किंवा wub99agm@waibank.com ई-मेल आय.डी.वर पाठवून नोंदणी करावी.
४) बँकेच्या वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या संकेतस्थळी (वेब साईट) www.waibank.co.in वर पाहता येईल. तसेच अहवालाच्या प्रती दि. २४/०९/२०२१ पासून सर्व शाखांमध्ये (सुट्टीच्या दिवशी सुद्धा) कार्यालयीन वेळेत उपलब्ध असतील.
५) काही अनपेक्षित परिस्थितीत उदा. तांत्रिक कारणामुळे सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज खंडीत झाल्यास त्याच लिंकवर सभेचे कामकाज पुढे सुरू केले जाईल, याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.
६) बँकेच्या सुधारित पोटनियमानुसार प्रत्येक सभासदाने पाच वर्षातून किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे, अनिवार्य आहे.

### सभासदांना नम्र विनंती

१) वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी सभासदांना V.C. / O.A.V.M. द्वारे सहभागी होता येईल.
२) जे सभासद ई-मेल आयडी, मोबाईल क्र. दिनांक २९/०९/२०२१ पर्यंत नोंदणी करतील त्यांना लॉगिन आय.डी. व पासवर्ड ई-मेल करण्यात येईल.
३) मा.सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य दि. २५/०२/२०२१ च्या परिपत्रकानुसार वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाची प्रक्रिया होणार आहे. ऑनलाईन उपस्थिती करिता सभासदांनी गुरूवार दि. ३०/०९/२१ रोजी सायं. ४ वा. ४५ मि. नंतर सभासदांनी कृपया लॉगिन करावे.
४) ऑनलाईन उपस्थिती संदर्भात काही अडचण आल्यास किंवा तांत्रिक माहिती हवी असल्यास मो. +९१ ९९२२०७००६५, +९१ ९०११०६७७५०, ०२१६७-२२०७७७ या क्रमांकावर संपर्क साधावा.
५) ज्या सभासदांनी त्यांच्या मोबाईल क्रमांकासाठी Do not disturb (DND) हा पर्याय निवडला असेल अशा सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी लॉगिन आय.डी. आणि पासवर्ड चा एस.एम.एस. मिळू शकणार नाही. अशा सभासदांनी कृपया (DND) रद्द करावा.
६) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार सर्व सभासद व खातेदारांनी के.वाय.सी. बाबतच्या कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
७) सभासदांनी आपल्या भागभांडवल रक्कमेसाठी वारसाचे नाव नोंदविले नसल्यास वारसाचे नाव नोंद करून घ्यावे.